**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०७ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्वत्र विविध जनजागृतीपर कार्यक्रम.
2. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना.
3. गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरण प्रकल्पात वन्य प्राण्यांच्या संचारासाठी अंडरपासची व्यवस्था.
4. औषधीयुक्त 'नॅनो पार्टिकल्स' आता 'ब्रेन ट्युमर'ला भेदणार, नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील संशोधकांचे यश.

---------------------------------------

**आरोग्य दिवस**

आरोग्यविषयक जागरूकता वाढवण्यासाठी आज जगभरात सर्वत्र ‘आरोग्य दिवस’ साजरा केला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना १९४८ मध्ये या दिवशी झाली. या वर्षीच्या आरोग्य दिवसाची मध्यवर्ती संकल्पना ‘निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य’ अशी आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत महाराष्ट्र आरोग्य सन्मान सोहळा-२०२५ या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. अधिक सुदृढ आणि निरोगी जग निर्माण करण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त दिलेल्या संदेशात पुन्हा एकदा व्यक्त केला आहे.कोणत्याही प्रगतीशील समाजाचा पाया आरोग्य हाच असतो, असं त्यांनी म्हटलं आहे.

---------------------------------------

**प्रतापराव जाधव-योग दिन**

केंद्रीय आयुष मंत्रालयान मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थानाच्या सहकार्यान कलिंगा मैदानात योग महोत्सवाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन

झालं. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ७५ दिवस बाकी असताना सुरू केलेल्या ‘उलटी गिनती’ या कार्यक्रमाविषयी प्रतापराव जाधव यांनी अधिक माहिती दिली..........

*अंतरराष्ट्रीय स्तर पर हमारी देश की जो धरोहर है, हमारी देश का जो पुराने जमाने से योगा चलते आ रहा है उसको पूरे दुनिया में ले जाने का काम हमारे आदरणीय प्रधानमंत्री जी ने किया। ये ग्यारहवां जो हमारा योग दिवस हम 21 जून को मना रहे हैं तो उसका 100 दिन का काउंटडाउन कार्यक्रम हमने तय किया था और हर 25 दिन के बाद में देश के हर एक कोने में ये कार्यक्रम होने जा रहे हैं।*

---------------------------------------

मन की बात

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ एप्रिल रोजी मन की बात या कार्यक्रमाद्वारे आकाशवाणीवरुन देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२१वा भाग असेल. कार्यक्रमाकरता आपल्या सूचना किंवा प्रश्न १८००-११-७८०० या टोलफ्री क्रमांकावर नोंदवता येतील. नरेंद्र मोदी ॲप किंवा माय GOV ओपन फोरम द्वारे देखील सूचना नोंदवता येतील. येत्या २५ तारखेपर्यंत येणाऱ्या सूचनांचा विचार करण्यात येईल.

---------------------------------------

सायबर गुन्हेगारी -फडणवीस

सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सरकार सायबर प्रयोगशाळांचं जाळं अधिकाधिक मजबूत करत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात सायबर प्रयोगशाळेचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. वरळी पोलीस ठाणे आणि गोवंडी पोलीस ठाण्यातल्या प्रयोगशाळांचं मुख्यमंत्र्यांनी ऑनलाईन उद्घाटन केलं. आगामी काळात या प्रयोगशाळा अत्यंत महत्वाच्या राहणार असल्याच फडणवीस म्हणाले.......

*आपण सगळे जाणतो कि भविष्य हे स्ट्रीट क्राइमपेक्षाही साइबर क्राइमचा आहे आणि साइबर क्राइमची जो डिल करणारा फोर्स हा आपल्याला अत्यंत महत्वाचा फोर्स लागणार आहे कारण या फोर्स मध्ये जो चोर आहे तो हि डिजिटली सैवी असणार आहे आणि जो पुलिस आहे त्यालाही टेक्नोलॉजिकल सैवी राहावं लागणार आहे. या दोघांचाही एक मला असं वाटतं की एक नवीन अश्या प्रकारचे*

*यूद्ध हे ऑलरेडी सुरु झालेलं आहे आणि त्या दृष्टीने बेस्ट आणि ॲडव्हान्स टेक्नोलोजिनी इक्विप्ट असलेल्या लॅब्स या अत्यंत महत्वाच्या आहे.*

यासह मुंबई पोलिसांच्या इतर उपक्रमांचंही उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं. त्यात मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन, अत्याधुनिक दुचाकी यांचा समावेश आहे. या प्रयोगशाळांमध्ये जगातलं अद्ययावत तंत्रज्ञान उपयोगात आणलं जाणार आहे. ऑनलाईन पद्धतीन पैशांची हेराफेरी करणं, बँक खातं हॅक करणं अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवर प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे.

---------------------------------------

सेन्सेक्स

भारतीय शेअर बाजारावर आज आठवड्याच्या सुरुवातीलाच तीव्र घसरण पाहायला मिळाली आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स तीन हजारांपेक्षा जास्त अंकांनी घसरला असून निफ्टी १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या टॅरिफ घोषणांमुळे व्यापार क्षेत्रात तयार झालेला ताण आणि अमेरिकेत मंदी येण्याच्या भीतीचा तीव्र परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसत आहे. दुपारच्या सत्रात या घसरणीचा वेग मंदावला आहे. सध्या सेन्सेक्स २ हजार ७००पेक्षा जास्त अंकांनी घसरून ७२ हजार ६०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर निफ्टीही ८००पेक्षा जास्त अंकांनी घसरून २१ हजार ९०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

---------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या गोंदिया बल्लारशा या रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळान मान्यता दिली असून या अंतर्गत सुमारे 240 किलोमीटर रेल्वे लाईनचा समावेश असून या अंतर्गत सुमारे 29 स्टेशन तसच रेल्वे अंडर ब्रीज यांचा समावेश असणार आहे. हा रेल्वे प्रकल्प नागझिरा नवेगाव या वन क्षेत्रातून जात असल्यान वन्य प्राण्यांच्या संचारासाठी अंडरपासची देखील या प्रकल्पामध्ये विशेषत्वान तरतूद करण्यात आल्याची माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी आज दिली. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकत्याच केंद्रीय मंत्रिमंडळांन घेतलेल्या

विविध राज्यातील रेल्वे प्रकल्पाबद्दल माहिती देण्यासाठी ऑनलाईन पत्र परिषद घेतली होती त्यावेळी गुप्ता बोलत होते.

---------------------------------------

नॅनो पार्टिकल्स

नाकाद्वारे दिलेले औषध थेट मेंदूतील गाठीपर्यंत पोहोचत औषधीयुक्त 'नॅनो पार्टिकल्स' आता जीवघेण्या 'ब्रेन ट्युमर'ला भेदणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील संशोधकांनी कॅन्सर या जीवघेण्या आजारावर कोठेही शक्य होईल, अशी उपचाराची नवीन पद्धत शोधून काढली आहे. उपचाराच्या नवीन पद्धतीमुळ कॅन्सरन ग्रस्त असलेल्या अनेक रुग्णांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.विणा शैलेंद्र बेलगमवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सागर त्रिवेदी यांनी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या 'इन्स्पायर फेलोशिप'मधून समाजासाठी अत्यंत उपयोगी असलेले हे नाविन्यपूर्ण संशोधन केले आहे. 'नोवेल टार्गेटेड ड्रग डिलिव्हरी सिस्टीम' अस या नवीन प्रकारच्या उपचार पद्धतीला नाव देण्यात आल आहे. स्प्रेद्वारे नाकावाटे औषधीतील नॅनो पार्टिकल्स न्यूरान्सच्या माध्यमातून थेट मेंदूतील गाठीपर्यंत पोहोचेल. या नवीन उपचार पद्धतीत औषधी मेंदूतील गाठींपर्यंत पोहोचत असताना रक्ताचा अडथळा होणार नाही, याची दक्षता देखील घेण्यात आली आहे.

---------------------------------------

हवामान -उष्मालहर

उद्या विदर्भातील अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून, परवा देखील अकोला जिल्ह्यात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. परवा अर्थात ९ एप्रिल रोजी नागपूर जिल्ह्यात देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, आज अकोला इथं सर्वाधिक 43 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली, तर नागपुरात 42 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. याशिवाय अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 42 अंश सेल्सिअसच्या पुढे आहे.

---------------------------------------

कुणाल कामरा

**कॉमेडियन कुणाल कामरान मुंबई पोलिसांनी त्याच्याविरोधात दाखल केलेल्या एफआयआरला (FIR) मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक वक्तव्य केल्याबद्दल कामराविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे. राज्यघटनेनं दिलेल्या अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्यासह मूलभूत अधिकारांवर घाला घालणारी ही कारवाई असल्याचा दावा कामरानं गेल्या शनिवारी दाखल केलेल्या याचिकेत केला आहे. या याचिकेवर २१ एप्रिलला सुनावणी होणार आहे. शिवसेना आमदार मुरजी पटेल यांच्या फिर्यादीनंतर पोलिसांनी कामराविरुद्ध २४ मार्चला गुन्हा दाखल केला होता.**

---------------------------------------